# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक - १५५
## सभावृत्तांत

दिनांक- २३.०२.२०१० वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार दिनांक २३.०२.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती - सभापती
२. मा.भोंडवे गणेश तुकाराम
३. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ
४. मा.साळुंखे सुरेखा मारुती
५. मा.पिल्ले राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी
६. मा.नितीन उर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
७. मा.कदम निर्मला सद्गुरु
८. मा.अशोक दशरथ सोनवणे
९. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
१०. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे
११. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
१२. मा.रामदास तानाजी कुंभार
१३. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
१४. मा.सौ.सुलोचना बबन बढे

याशिवाय मा.डुंबरे-अति.आयुक्त,मा.देशमुख,मा.गायकवाड,मा.मुंढे,मा.पवार-सहा.आयुक्त,मा.काळे-नगरसचिव, मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्य. अधिकारी,मा.पाटील-उपसंचालक नगररचना,मा.कपिले, मा.महाडीक, मा.थोरात,मा.चिंचवडे,मा.जाधव,मा.चव्हाण-कार्य.अभियंता,मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.चोरगे-भांडार अधिकारी मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-</u>

विषय क्रमांक :- २२) प्लॅस्टीक बॅगांवर बंदी आणणेबाबत - मा.जितेंद्र ननावरे, मा.राजेश पिल्ले यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- २३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले जयंती महोत्सवाबाबत - मा.प्रशांत शितोळे,मा.नितीन ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- २४) ॲड.अजय सुर्यवंशी यांना कायदा सल्लागार पदी नेमणुक सोयीसुविधा देणेबाबत-मा.मनोहर पवार,मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- २५) सन २००९-१० मधील गुंतवणुकीबाबत - मा.मनोहर पवार,मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- २६) ठ.क्र.१०६८७ रद्द करणेबाबत - मा.भाऊसाहेब सुपे, मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- २७) ड्रेनेज लाईन साफसफाई करणेबाबत - मा.मनोहर पवार, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- २८) साईदिप प्रतिष्ठानना जागा भाड्याने देणेबाबत - मा.सुरेखा साळुंखे, मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- २९) सर्वे नं.९ बापुजीबुवा उद्यानाचे देखभालीचे कामाबाबत - मा.मनोहर पवार,मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ३०) छपाई साहित्य पुरविणेबाबत - मा.भाऊसाहेब सुपे, मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ३१) महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (MESCO) पुणे यांचेकडील माजी सैनिक सुरक्षा रक्षक कंत्राट पद्धतीने घेणेबाबत -

विषय क्रमांक :- ३२) मानधनावर बंदुकधारी सुरक्षा रक्षक (माजी सैनिक) नेमणूकीबाबत -

विषय क्रमांक :- ३३) प्र.क्र.२४ KSB चौक ते टेल्को सबस्टेशन पर्यंतच्या रस्ता रुंदीकरणात अडथळा करणारे उच्चदाब वीजवाहीनी हलविणेबाबत -

विषय क्रमांक :- ३४) नाटकाचे प्रयोगांबाबत - मा.आशा सुर्यवंशी, मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ३५) निविदा नोटीस क्र.ई-१७/१२-२००९-१० मधील कामांचे करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत -

विषय क्रमांक :- ३६) कॉम्प्युटर ऑपरेटर पदावर एकत्रित मानधनावर नियुक्तीबाबत - मा.सुलोचना बढे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ३७) आरोग्य विभागाकरीता ऑटो रिक्षा हॉपर्स खरेदी करणेबाबत - मा.सुलोचना बढे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ३८) औंध रावेत रस्त्याचे जाहिरातींचे हक्क देणेबाबत - मा.सुलोचना बढे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ३९) महानगरपालिकेच्या वाय.सी.रुग्णालयात हेल्थ कार्ड सॉफ्टवेअर सिस्टीम राबविणेबाबत - मा.सुलोचना बढे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ४०) ठ.क्र.१०६६८ रद्द करणेबाबत - मा.जितेंद्र ननावरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ४१) संडास ब्लॉक साफसफाईकामी देणेबाबत तसेच जाहीरात हक्काबाबत - मा.सुलोचना बढे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ४२) रुग्णवाहिका खरेदीबाबत - मा.नितीन ओव्हाळ,मा.राजेश पिल्ले यांचा प्रस्ताव...

---------------

उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे विषय क्रमांक १,२,३,४,५,६, ७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०,३१ ३२,३३,३४,३५,३७,३८,३९,४०,४१,४२,१८,१९,२० या क्रमाने कामकाजाच्या बाबी विचारार्थ घेणेत येतील असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------------

ठराव क्रमांक- १०७०३ विषय क्रमांक- १
दिनांक- २३.२.२०१० विभाग- नागरवस्ती विकास
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:- १) मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/५/कावि/४४/२०१० दि.१५/१/२०१०
२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठ.क्र.२३ दि.१०/२/२०१०

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील मुलींना यो.क्र.- १० खाजगी क्लासची फी देणेकामी अर्थसहाय्य देणे या योजने अंतर्गत प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ प्रमाणे २०० लाभार्थीना प्रत्येकी र.रु.१०००/- प्रमाणे एकत्रित र.रु.२,००,०००/- अदा करणेस तसेच सदर योजनेतील व इतर सर्व योजनांमधील अपात्र असलेल्या व तद्नंतर कागदपत्रांची पुर्तता करणा-या सर्व पात्र लाभार्थीना संबंधित योजनेनुसार अर्थसहाय्य अदा करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक- १०७०४ विषय क्रमांक- २
दिनांक- २३.२.२०१०
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:- १) मा.ज्योती भारती व मा.सुषमा गावडे यांचा प्रस्ताव..
२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठ.क्र.२६ दि.१०/२/२०१०

दि.८ मार्च जागतिक महिला दिन मनपाच्या महिला व बालकल्याण समितीच्या मार्फत आयोजित करणे आवश्यक असल्याने यासाठी मनपाच्या चार प्रभागामध्ये विविध सामाजिक, प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करणेस व त्याकामी येणारे र.रु.१०,००,०००/- खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०७०५ विषय क्रमांक- ३
दिनांक- २३.२.२०१० विभाग :- मुख्यलेखापरिक्षक
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/११/२०१०
दि.११.२.२०१०

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१८.१.२०१० ते दि.२४.१.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/११/२०१० दि.११.२.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०७०६ विषय क्रमांक- ४
दिनांक- २३.२.२०१० विभाग :- मुख्यलेखापरिक्षक
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ:- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/१२/२०१० दि.११.२.२०१०

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२५.१.२०१० ते दि.३१.१.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१२/२०१० दि.११.२.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७०७ विषय क्रमांक- ५
दिनांक- २३.२.२०१० विभाग :- स्थापत्य पुल व प्रकल्प
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/प्रकल्प/९७/२०१० दि.११.२.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मुंबई पुणे महामार्गावर जाहीरात हक्क देणेच्या कामांतर्गत कामासाठी जाहीरात प्रसिद्ध केलेल्या दै.टाईम्स् ऑफ इंडिया (पुणे व मुंबई आवृत्ती) र.रु.३,५८,५६०, दै.पुढारी (पुणे) र.रु.२१६०/-, दै.इंडियन एक्सप्रेस (मुंबई आवृत्ती) व दै.लोकसत्ता (मुंबई आवृत्ती) एकत्रीत र.रु.१,९५,२००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७०८ विषय क्रमांक- ६
दिनांक- २३.२.२०१० विभाग :- ब प्रभाग
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/९/२५/१० दि.१०.२.२०१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.५/२००९-१० मधील अ.क्र.३ अन्वये, तालेरा व जिजामाता हॉस्पिटल येथील जनरेटरची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.ओम एकदंताय इलेक्ट्रीकल (नि.र.रू.१,३९,९७७/- [र.रू.एक लाख एकोणचाळीस हजार नऊशे सत्त्याहत्तर] पेक्षा १५% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७०९ विषय क्रमांक- ७
दिनांक- २३.२.२०१० विभाग :- ब प्रभाग
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/९/२७/१० दि.१०.२.२०१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.५/२००९-१० मधील अ.क्र.५ अन्वये, रावेत व किवळे जकात नाका येथील डिझेल जनरेटर सेट आणि U.P.S.ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.ओम एकदंताय इलेक्ट्रीकल (नि.र.रू.४,६६,०९२/- [र.रू.चार लाख सहासष्ट हजार ब्याण्णव] पेक्षा १८% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक- १०७१० विषय क्रमांक- ८
दिनांक- २३.२.२०१० विभाग :- वायसीएमएच
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच/एमएस/कावि/६१/१० दि.१३.२.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये डॉ.डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स् ॲन्ड सायन्सच्या विद्यार्थ्यांना Clinical Psychology प्रशिक्षणासाठी माहे ०८/०२/२०१० ते २०/०३/२०१० या कालावधीसाठी पूर्वलक्षीप्रभावाने एकुण ५ विद्यार्थ्यांना प्रशिक्षणास अनुमती देण्यास व त्यासाठी होणारी फी र.रु.२१००/- आकारण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक- १०७११ विषय क्रमांक- ९
दिनांक- २३.२.२०१० विभाग :- वायसीएमएच
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच/एमएस/कावि/६२/१० दि.१३.२.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये लोकमान्य मेडिकल फाऊंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंग एज्युकेशनच्या विद्यार्थ्यांना Health Nursing Experience साठी माहे १५/०२/२०१० ते १४/०३/२०१० या

कालावधीसाठी एकुण ७ विद्यार्थ्यांना प्रशिक्षणास अनुमती देण्यास व त्यासाठी होणारी फी र.रु.२९४०/- आकारण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०७१२ विषय क्रमांक- १०
दिनांक- २३.२.२०१० विभाग :- वायसीएमएच
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच/८अ/कावि/७६/१० दि.११.२.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

डॉ.प्रविण रामदास गांजरे - एम.एस.,एफ.सी.पी.एस., एम.सी.एच. (Magister Chirurgie) यांना तात्पुरत्या स्वरुपात आदेशाच्या दिनांकापासून सहा महिने कालावधीकरता दरमहा एकत्रित र.रु.२५,०००/- मानधनावर नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०७१३ विषय क्रमांक- ११
दिनांक- २३.२.२०१० विभाग :- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.म.भां./८/कावि/२९/१० दि.१५.२.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाची दैनंदिनी छपाई करुन घेणेकामी लघुत्तम निविदाकार मे.आशिष एंटरप्रायजेस यांना एक्झीक्युटीव्ह दैनंदिनी ७००० नग एकूण र.रु.४,०८,७३०/- (र.रू.चार लाख आठ हजार सातशे तीस) व मे.पंकज प्रिंट प्रॉडक्टस यांना पॉकेट डायरी ६५०० नग एकूण र.रु.९२,६२५/- (र.रू.ब्याण्णव हजार सहाशे पंचवीस) याप्रमाणे दर स्वीकृत करुन करारनामा करुन पुरवठा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०७१४ विषय क्रमांक- १२
दिनांक- २३.२.२०१० विभाग :- स्थापत्य
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.निर्मला कदम
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/४०४/१० दि.१५.२.१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/२००९-१० मधील अ.क्र.०७ अन्वये, आकुर्डी दवाखान्याशेजारील १२.०० मी. रस्त्याच्या कडेला रिटेनिंग वॉल बांधणे व नाल्याची उंची वाढवणेकामी मे.अे.डी.देवकर (नि.र.रू.२३,३२,२८०/- [र.रू.तेवीस लाख बत्तीस हजार दोनशे ऐंशी] पेक्षा ३५.३५% कमी) या

ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१५,०७,८१९/- [र.रू.पंधरा लाख सात हजार आठशे एकोणीस] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०७१५ विषय क्रमांक- १३
दिनांक- २३.२.२०१० विभाग :- विद्युत मुख्य कार्यालय
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.विद्युत/नि/१अ/कावि/६२/१० दि.११.२.२०१०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.११/२००९-१० मधील अ.क्र.१ अन्वये, पिंपरी चिंचवड मनपाच्या गवळीमाथा पंपींग स्टेशनकरिता एक्सप्रेस फिडरद्वारे दुहेरी विजपुरवठा करणेकामी भोसरी RSमध्ये पारेषण कंपनीशी संबंधित अनुषंगिक कामे करणेकामी मे.एस.टी. इलेक्ट्रीकल्स् प्रा.लि. (नि.र.रू.८,८४,९२५/- [र.रू.आठ लाख चौऱ्याऐंशी हजार नऊशे पंचवीस] पेक्षा २% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०७१६ विषय क्रमांक- १४
दिनांक- २३.२.२०१० विभाग :- माध्यमिक शिक्षण
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/१/कावि/२१७/१० दि.१६.२.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

संगणक प्रशिक्षक म्हणून प्रस्तावात नमुद उमेदवारांना मनापाचे १८ माध्यमिक विद्यालयामध्ये सहा महिने कालावधीसाठी प्रत्येकी र.रू.५,०००/- [र.रू.पाच हजार] एकत्रित मानधनावर आदेशाचे दिनांकापासून नेमणूक देणेस व मानधनापोटी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १०७१७ विषय क्रमांक- १५
दिनांक- २३.२.२०१० विभाग :- ब प्रभाग कार्यालय
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/९/३६/१० दि.१५.२.२०१०
मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.१०९ अन्वये, मनपा भवन अंतर्गत वाहतुकीस अडथळा तसेच रस्ता रूंदीकरणात येणारे फिडर पिलर पोल शिफ्ट करणे व दुरुस्त करणेकामी मे.निशांत इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू.४,६६,८२४/- [र.रू.चार लाख सहासष्ट हजार आठशे चोविस] पेक्षा २१ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७१८ विषय क्रमांक- १६
दिनांक- २३.२.२०१० विभाग :- ब प्रभाग कार्यालय
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/९/३५/१० दि.१५.२.२०१०
मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.९९ अन्वये, प्रभाग क्र.६७ मधील लक्ष्मीनगर अंतर्गत रस्त्यावर सोडियम व्हेपर पोल व फिटिंगचे नुतनीकरण करणे कामी मे.निशांत इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू.३,००,०००/- [र.रू.तीन लाख] पेक्षा ३६.६० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७१९ विषय क्रमांक- १७
दिनांक- २३.२.२०१० विभाग :- ब प्रभाग कार्यालय
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/९/३४/१० दि.१५.२.२०१०
मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.९८ अन्वये, ब प्रभागांतर्गत चिंचवड येथील सोडियम व्हेपर पोल व फिटिंगचे नुतनीकरण करणेकामी मे.निशांत इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू.४,२०,०८८/- [र.रू.चार लाख वीस हजार अठ्ठ्याऐंशी] पेक्षा ३६.६० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर

कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७२० विषय क्रमांक- २१
दिनांक- २३.२.२०१० विभाग :- झोनिपु स्थापत्य
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.रामदास कुंभार
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/९८/१० दि.१७.२.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

वॉर्ड क्र.३६ आनंदनगर येथे मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन यांचेकडून संडास ब्लॉक बांधणेचे काम निविदा न मागविता व करारनामा करून तसेच या कामासाठी बँक गॅरंटी न घेता कामाचे आदेशासोबत निविदा रक्कम + १७.५० % कार्यवाहीभार शुल्क रक्कमेच्या ५० % आगावू व ५०% काम पुर्ण झाल्यावर ४० % रक्कम आगावू व उर्वरीत १०% रक्कम काम १०० % पुर्ण झाल्यावर अदा करणेचे अटीवर करून घेणेस व त्यासाठी येणारे र.रू.३२,८२,२१५/- [र.रू.बत्तीस लाख ब्याऐंशी हजार दोनशे पंधरा]) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - १०७२१ विषय क्रमांक- २२
दिनांक- २३.२.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ- मा.जितेंद्र ननावरे, मा.राजेश पिल्ले यांचा प्रस्ताव...

शहरामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे प्रदुषण वाढताना पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. प्लॅस्टीकच्या बॅगापासूनही पर्यावरणास फार मोठा धोका पोचत आहे. ५० मायक्रॉन पेक्षा कमी प्लॅस्टीकच्या बॅगा खराब कच्च्या मालापासून तयार करतात व त्याची रिसायकलींग होत नाही तरी महाराष्ट्र शासनाच्या आदेशाप्रमाणे संपुर्ण महापालिकेच्या हद्दीमध्ये ५० मायक्रॉन पेक्षा कमी प्लॅस्टीक बॅग पिशव्या यांच्यावर तातडीने बंदी आणून त्यांची अंमलबजावणी तातडीने करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७२२ विषय क्रमांक- २३
दिनांक- २३.२.२०१०
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ- मा.प्रशांत शितोळे, मा.नितीन ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांची संयुक्त जयंती निमित्त महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. जयंती महोत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम, मान्यवरांच्या

व्याख्यानमाला, इतर अनुषंगिक बाबींसाठी त्याकरीता चहापान, भोजन व्यवस्था, बॅनर, मानधन, दिप महोत्सव, स्मृतीचिन्हे रांगोळी, फटाके आताषबाजी इत्यादीसाठी र.रू.२०,००,०००/- थेट पध्दतीने येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७२३ विषय क्रमांक- २४
दिनांक- २३.२.२०१०
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ- मा.मनोहर पवार, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

ॲड.अजय सुर्यवंशी यांस कायदा सल्लागार पदी दिनांक २४/३/२०१० पासून दरमहा र.रू.३५,०००/- मानधनावर यापुर्वी देण्यात आलेल्या सर्व सुखसोयींसह सहा महिने कालावधी करिता नव्याने नेमणुक देण्यास व त्याकामी प्रत्यक्ष खर्चास तसेच कायदा सल्लागार यांची नेमणुक मानधनावरील असल्याने ते न्यायालयीन कामकाजासाठी मुंबई व दिल्ली येथे वास्तव्यास असताना त्यांच्या प्रवासाचे व वास्तव्याचे कालावधीस उदरनिर्वाहासाठी र.रू.३००/- प्रति दिवस किंवा येणारा प्रत्यक्ष खर्च या पैकी कमीत कमी जो असेल तो अदा करण्यास तसेच ठराव क्र.१४७० दिनांक २६/११/०२ अन्वये मान्यता देण्यात आलेला खर्च व सोयी सुविधा त्यांना देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७२४ विषय क्रमांक- २५
दिनांक- २३.२.२०१०
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ- मा.मनोहर पवार, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ९२ मधील तरतूदीनुसार मनपा निधीतील शिलकी रकमांची राष्ट्रीयकृत बॅंकेत मा.स्थायी समितीने प्रदान केलेल्या अधिकारा नुसार मा.अध्यक्ष यांचे शिफारशीनुसार ठेवींचे नुतनीकरण, गुंतवणूक करण्यात येते. त्यानुसार सन २००९-१० या आर्थिक वर्षात मा.अध्यक्ष, स्थायी समिती यांचे शिफारशीनुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या गुंतवणूकीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७२५ विषय क्रमांक- २६
दिनांक- २३.२.२०१०
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.भाऊसाहेब सुपे, मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.१०६८७ दिनांक १८/२/२०१० रद्द करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७२६ विषय क्रमांक- २७
दिनांक- २३.२.२०१०
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ- मा.मनोहर पवार, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने ड्रेनेज लाईन साफसफाई करण्यासाठी चार जेटींग गाड्या खरेदी केल्या आहेत. J.N.N.U.R.M. योजने अंतर्गत मोठ्या प्रमाणात ड्रेनेज लाईन टाकण्यात आल्या आहेत व टाकण्यात येत आहेत. यामुळे ड्रेनेज लाईनचे चोक अप काढणे व साफसफाई करणे या कामाची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या ड्रेनेज लाईन्सची साफसफाई वेळोवेळी करणे लोक आरोग्याच्या दृष्टीने फार महत्वाचे आहे. त्यामुळे अशा पध्दतीचे काम करण्याचा अनुभव असणारे मे.सुरज कॉन्ट्रक्टर यांचे ताब्यात या गाड्या देवून त्याचे कडून थेट पध्दतीने निविदा न मागविता करारनामा करून सदर गाड्याच्या चालन देखभाल व किरकोळ दुरुस्ती म्हणजेच पमचर, ऑईल, डिझेल, व्हिल अलायमेन्ट, ड्राव्हर, ऑपरेटर प्रत्येक गाडीवर दोन लेबर व मोठ्या दुरुस्त्या मनपाने करणे या धर्तीवर ३,००० लिटर क्षमतेच्या गाडीसाठी र.रू.६,९८४/- व ६,००० लिटर क्षमतेच्या गाडीसाठी र.रू.७,९८४/- व ८,००० लिटर क्षमतेच्या गाडीसाठी र.रू.१०,९८४/- या दराने आठ तासाच्या एका पाळीसाठी हे काम ५ वर्षे कालावधीसाठी (प्रती वर्षे १० % दर वाढ देण्याच्या अटीवर) येणारा पावसाळा व कामाची तातडी विचारात घेवून निविदा न मागविता तथापी करारनामा करून मे.सुरज कॉन्ट्रक्टर यांना थेट पध्दतीने देण्यास व याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७२७ विषय क्रमांक- २८
दिनांक- २३.२.२०१०
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.सुरेखा साळुंखे, मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

साईदिप प्रतिष्ठान यांस प्राधिकरण येथील माध्यमिक विद्यालय सिंधूनगर या शाळेची इमारत शैक्षणिक संस्थेसाठी मा.उपसंचालक नगररचना ठरवतील त्या योग्य त्या भाड्याने/लिज ने २१ वर्षे कालावधीसाठी देण्यास व त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

खालीलप्रमाणे सुचना मांडण्यात आली.

सुचक :- मा.प्रशांत शितोळे　　　　　　　　　　अनुमोदक :- मा.राजेश पिल्ले

गुरुवार दिनांक २५/२/२०१० रोजी दु.३:०० पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

---------------------

मा.सभापती :- गुरुवार दिनांक २५/२/२०१० रोजी दुपारी ३:०० पर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

(भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

\\Nagersachiv४\nnn\Nagersachiv१\Standing ०७-१२\Standing ०७-१२\proceding-१५५.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक - १५५
<u>सभावृत्तांत</u>
<u>(दि.२३.२.२०१० ची तहकूब सभा)</u>

दिनांक- २५.०२.२०१०                    वेळ :- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.२३.०२.२०१० ची तहकूब सभा गुरुवार दिनांक २५.०२.२०१० रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती - सभापती
२. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ
३. मा.पिल्ले राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी
४. मा.नितीन उर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
५. मा.कदम निर्मला सद्‌गुरु
६. मा.जगदीश शंकर शेट्टी
७. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
८. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
९. मा.सौ.सुलोचना बबन बढे

याशिवाय मा.देशमुख,मा.मुंढे-सहा.आयुक्त,मा.काळे-नगरसचिव, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.कुदळे,मा.चिंचवडे-कार्य. अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---

ठराव क्रमांक- १०७२८                    विषय क्रमांक- २९
दिनांक- २५.२.२०१०
सुचक- मा.मनोहर पवार                    अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ- मा.मनोहर पवार,मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

अमरदीप मित्र मंडळ सर्वे नं.९ बापुजीबुवा थेरगांव उद्यानाचे काम पहात आहे. तरी पुढील एक वर्षांकरिता नविन किमान वेतन दराने मंडळास देखभालीचे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७२९ विषय क्रमांक- ३०
दिनांक- २५.२.२०१०
सुचक- मा. भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा. मनोहर पवार
संदर्भ- मा.भाऊसाहेब सुपे,मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

मनपाचे वेगवेगळ्या विभागाचे छपाई साहित्य पुरविणेकामी निविदा सूचना क्र. ४/१/२००९-१० अन्वये निविदा मागविणेत आलेली होती. त्यामध्ये ८ १/२" X १३ १/२" सफेद व लेजर पेपर १०० पानी रजि.रु.४३/- प्रती नग व २०० पानी रजि. छापून घेतल्यास रु.८६/- प्रती नग, १३ १/२" X १७" सफेद व लेजर पेपर १०० पानी रजि. रु.८०/- प्रती नग व २०० पानी रजि. छापून घेतल्यास रु.१६०/- प्रती नग, १७" X २७" सफेद पेपर १०० पानी रजि.रु.१८०/- प्रती नग व २०० पानी रजि. घेतल्यास रु.३६०/- प्रती नग, १७" X २७" लेजर पेपर १०० पानी रजि.रु.१९०/- प्रती नग व २०० पानी रजि.घेतल्यास रु.३८०/- प्रती नग, १८"X२३" सफेद पेपर १०० पानी रजि. रु.१८५/- प्रती नग व २०० पानी रजि. घेतल्यास रु.३७०/- , प्रती नग, १८" X २३" लेजर पेपर १०० पानी रजि. रु.२१०/- प्रती नग व २०० पानी रजि. घेतल्यास रु.४२०/- प्रती नग याप्रमाणे वरील सर्व रजिस्टर्स मे.अमृत मुद्रणालय यांचेकडून सन २०१०-११ या वित्तीय वर्षाकरीता छपाई करुन घेण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७३० विषय क्रमांक- ३१
दिनांक- २५.२.२०१० विभाग - सुरक्षा
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.निर्मला कदम
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सुवि/३/कावि/२५२/१० दि.२३/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मिळकतींपैकी सद्यस्थितीत करसंकलन कार्यालय, जकात नाके, या ठिकाणी सुरक्षा रक्षकांची तातडीने आवश्यकता असलेमुळे महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (MESCO) पुणे या महाराष्ट्र शासनाच्या अंगिकृत संस्थेकडून ३८ सुरक्षा रक्षक व २ सुरक्षा सुपरवायझर अनुक्रमे र.रु.८,६३६/- व र.रु.११,४५५/- प्रति माह या दराने नेमणुकीस तसेच त्यांचे अटी शर्तीनुसार वरील दरामध्ये शासनाकडील आदेशानुसार व बदलानुसार वाढीव दर देणेस व प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७३१ विषय क्रमांक- ३२
दिनांक- २५.२.२०१० विभाग -सुरक्षा
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सुवि/३/कावि/२५३/१० दि.२३/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पात्र अर्जानुसार प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ मधील ४३ माजी सैनिक कर्मचाऱ्यांमधून शारिरीक चाचणी व सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेल्या माजी सैनिक कर्मचाऱ्यांमधून ३० माजी सैनिक कर्मचाऱ्यांची बंदुकधारी सुरक्षा रक्षक पदावर प्रति बंदुकधारी सुरक्षा रक्षक प्रति माह रक्कम रुपये ७,३००/- मानधनावर ६ महिने कालावधीसाठी नेमणूक करणेस व प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७३२ विषय क्रमांक- ३३
दिनांक- २५.२.२०१० विभाग -अ प्रभाग, विद्युत
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ- मा.विकास अभियंता यांचे जावक क्र.अप्र/वि/आ/६८/१० दि.२३/२/१०

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.२४ KSB चौक ते टेल्को सबस्टेशन पर्यंतच्या रस्ता रुंदिकरणात अडथळा करणारे उच्चदाब वीजवाहीनी हलविणे या कामाचे १.३% सुपरव्हिजन चार्जेस र.रु.१,०२१६०/- म.रा.वि.वि. कं.स अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७३३ विषय क्रमांक- ३४
दिनांक- २५.२.२०१०
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ- मा.आशा सुर्यवंशी, मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव...

महिला - पुरुष नागरिकांसाठी HIV एडस् सारख्या विषयावर जनजागृती करण्यासाठी वझिरा या संस्थेने अत्यंत प्रभावी नाटकनिर्मीती केली असुन सदर संस्थेस मुंबई महानगरपालिका, पुणे महानगरपालिका यांनी प्रयोग करण्यास मान्यता दिली आहे. तसेच महाराष्ट्र शासनानेही सदर संस्थेची शिफारस केलेली आहे. म्हणून सदर वझिरा गणेश निर्मित संस्थेस नाटकाचे प्रयोग करण्यास तसेच प्रत्येक प्रभागामध्ये किमान एक प्रयोग प्रमाणे एक दिवसामध्ये तीन प्रयोगास तसेच प्रत्येक प्रयोगास र.रु.३५,०००/- याप्रमाणे चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७३४ विषय क्रमांक- ३५
दिनांक- २५.२.२०१० विभाग - स्थापत्य क मुख्यालय
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३क/कावि/३९/१०दि.२०/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/२००९-१० मधील अ.क्र.१२ अन्वये, प्रभाग क्र.८ मधील आ.क्र.२४ नियोजित खेळाचे मैदानात जलतरण तलाव बांधणे अ) उर्वरित कामे करणे (रु.४३,६८,३१९/-) ब) उर्वरित सिमाभिंत बांधणे, फिल्ट्रेशन विद्युतविषयक कामे करणे (रु.४३,६६,५३४/-) कामी मे.बी.के.खोसे (नि.र.रू.८७,३४,८५३/- [र.रू.सत्त्याऐंशी लाख चौतीस हजार आठशे त्रेपन्न] पेक्षा ३.६५% जास्त) या ठेकेदाराकडून निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७३५ विषय क्रमांक- ३६
दिनांक- २५.२.२०१०
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.सुलोचना बढे,मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागासाठी श्रीम.मंजु देवीचंद रोहरा यांना एकत्रित मानधनावर कॉम्प्युटर ऑपरेटर या पदावर नियुक्ती देणेत आलेली आहे. सदर नियुक्ती कालावधी दिनांक २८/२/२०१० रोजी संपुष्टात येत असल्यामुळे व वैद्यकिय विभागासाठी कॉम्प्युटर ऑपरेटर पदाची आवश्यकता असल्यामुळे श्रीम.मंजु देवीचंद रोहरा यांना वैद्यकिय विभागासाठी कॉम्प्युटर ऑपरेटर या पदावर दरमहा र.रु.८,०००/- एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीसाठी नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७३६ विषय क्रमांक- ३७
दिनांक- २५.२.२०१०
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक-मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.सुलोचना बढे,मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.म.सा.भां/५/कावि/६७/२०१० दिनांक ९/२/२०१० मधील शिफारसीप्रमाणे मा.स्थायी समितीने पारित केलेल्या ठराव

क्र.१०६१३ दि.९/२/२०१० आधारे मनपा क्षेत्रातील घरोघरचा कचरा गोळा करणेकामी मे.टाटा मोटर्स लि. यांचेकडुन आणखी १४५ नग स्मॉल फोर व्हीलर व्हेईकल चासीस (मॉडेल ACE THE ३) करारनामा करुन खरेदी करण्यास व सदर चासीजना मनपा स्पेसिफिकेशन प्रमाणे मे.एम.एस.एस.आय.डी.सी.लि. यांचेकडुन करारनामा करुन १.८ क्यू.मी. क्षमतेचे डंपर हॉपर बांधुन घेण्यास (तीन वर्ष AMC सह) व मागील ठरावाच्या आधारे दर्जा व दराप्रमाणे येणाऱ्या खर्चास तसेच मे.टाटा मोटर्स लि. यांना १००% व मे.एम.एस.एस.आय.डी.सी.लि. यांना ७५% ॲडव्हान्स पेमेंट योग्य ती बँक गॅरंटी घेऊन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७३७ विषय क्रमांक- ३८

दिनांक- २५.२.२०१०

सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.मनोहर पवार

संदर्भ- मा.सुलोचना बढे,मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पुणे मुंबई रस्ता याचे जाहिरातींच्या हक्कांच्या बदल्यात सदर रस्त्याचे जे काम मे.बी.व्ही.जी.ई.लि. करीत आहे. त्याच धर्तीवर औंध रावेत रस्त्याचे जाहिरातींचे हक्क मे.बी.व्ही.जी.ई.लि. यांना देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७३८ विषय क्रमांक- ३९

दिनांक- २५.२.२०१०

सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.मनोहर पवार

संदर्भ- मा.सुलोचना बढे,मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.१०६७९ दि.१८/२/२०१० नुसार यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामध्ये हेल्थ कार्ड सॉफ्टवेअर सिस्टीम राबविणेसाठी मे.अमृता टेक्नॉलॉजीस यांना Software customization and development (one year warranty) करणेसाठी मंजुरी देणेत आलेली आहे. तरी Software development झालेनंतर व warranty संपलेनंतर पूढील ५ वर्ष कालावधीकरीता सिस्टीम ऑपरेशन व देखभाल (operation & maintenance) करणेसाठी मे.अमृता टेक्नॉलॉजीस यांनी दि.४/२/२०१० रोजी सादर केलेले Revised proposal मध्ये नमुद केलेले दराप्रमाणे त्यांचेकडून काम करुन घेणेस व त्याकामी येणारे प्रत्यक्ष खर्चास व करारनामा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७३९ विषय क्रमांक- ४०
दिनांक- २५.२.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.जितेंद्र ननावरे,मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.१०६६८ दि.१८/२/२०१० रद्द करणेत येत आहे व मा.आयुक्त यांचे जा.क्र.प्रशासन/६/कावी/७७/१० दि.८/२/१० नुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७४० विषय क्रमांक- ४१
दिनांक- २५.२.२०१०
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.सुलोचना बढे,मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

तिरुमला स्वयंरोजगार सेवा सह संस्था यांचेकडून चिंचवड वॉर्ड क्र.३६ आनंदनगर मधील संडास ब्लॉक देखभाल संरक्षण साफसफाईकामी पुढील तीन वर्षे कालावधीसाठी किमान वेतन दराने स्वयंसेवक उपलब्ध करुन घेऊन त्यांचेकडून उपरोक्त काम करुन घेण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत शहरातील एकूण १० चौकातील जाहीरातींचे हक्क ०२ वर्षे कालावधीसाठी देणेची ई-टेंडरींग निविदा काढणेत आली होती. त्यामध्ये दोन निविदा प्राप्त झाल्या असून मे.बिग इंडिया ग्रुप, प्राधिकरण, निगडी, पुणे ४११०४४ यांनी सोबतचे प्रपत्रातील चौकातील नावासमोर दर्शविण्यात आलेला प्रती चौ.फुट प्रती महा दर हा मनपाचे सध्याचे प्रचलित दरापेक्षा ६००% जास्त दिल्याने सदरचे दर हे मनपा जागा भाडेसहीत स्विकृत करणेस व कामाचा करारनामा दोन वर्षे कालावधीऐवजी पाच वर्षे कालावधीसाठी करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०७४१ विषय क्रमांक- ४२
दिनांक- २५.२.२०१०
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ- मा.नितीन ओव्हाळ,मा.राजेश पिल्ले यांचा प्रस्ताव...

रुग्णवाहिका विभागासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील रुग्णवाहीका उत्पादीत कंपनी मे.प्रिमिअर लि. आकुर्डी यांचेकडून Sigma १.४ Life Line (Ambulance) Non A\C, BS\३ Solid White या वर्णनाची १ ॲम्बुलन्स

किंमत र.रु.५,४९,४७९/- अधिक विमा याप्रमाणे एकुण १० ॲम्बुलन्स थेट पद्धतीने करारनामा न करता निविदा न मागविता खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १०७४२ विषय क्रमांक- १८
दिनांक- २५.२.२०१० विभाग :- ब प्रभाग
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/९/३३/१० दि.१५/२/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.९५ अन्वये, चिंचवड विभागातील अपघातग्रस्त पोलची दुरुस्ती करणे व इतर विद्युत विषयक कामे करणेकामी मे.निशांत इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू.४,४९,९९०/- [र.रू.चार लाख एकोणपन्नास हजार नऊशे नव्वद] पेक्षा ३६.६० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १०७४३ विषय क्रमांक- १९
दिनांक- २५.२.२०१० विभाग :- ब प्रभाग
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/९/३७/१० दि.१५/२/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.११० अन्वये, मनपा भवन अंतर्गत मनपाच्या विविध इमारतींमध्ये वायरिंग दुरुस्त करणेकामी मे.निशांत इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू.४,६६,६८२/- [र.रू.चार लाख सहासष्ट हजार सहाशे ब्याऐंशी] पेक्षा २१ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १०७४४ विषय क्रमांक- २०
दिनांक- २५.२.२०१० विभाग :- मुख्यलेखापरिक्षक
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/१४/१० दि.१५/२/१०

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील जानेवारी २०१० मधिल सुधारित एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/९/कावि/३२६/२०१०
दिनांक - २६/०२/२०१० चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी

## मा. स्थायी समिती

ठराव क्रमांक- १०७३४ विषय क्रमांक- ३५
दिनांक- २५.२.२०१० विभाग - स्थापत्य क मुख्यालय
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३क/कावि/३९/१०दि.२०/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/२००९-१० मधील अ.क्र.१२ अन्वये, प्रभाग क्र.८ मधील आ.क्र.२४ नियोजित खेळाचे मैदानात जलतरण तलाव बांधणे अ) उर्वरित कामे करणे (रु.४३,६८,३१९/-) ब) उर्वरित सिमाभिंत बांधणे, फिल्ट्रेशन विद्युतविषयक कामे करणे (रु.४३,६६,,५३४/-) कामी मे.बी.के.खोसे (नि.र.रू.८७,३४,८५३/- [र.रू.सत्त्याऐंशी लाख चौतीस हजार आठशे त्रेपन्न] पेक्षा ३.६५% जास्त) या ठेकेदाराकडून निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

प्रत- (कार्यालयीन कामकाजास्तव)

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८